No. EAU/ICD/2018-19/536
dt. 18/2/19

(1)

# मुंबई विद्यापीठ

मसुदा
क्र./२०१८-१९

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

**मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०१८-१९ मधील दि. २९ जानेवारी २०१९ व दिनांक ६ फेब्रुवारी, २०१९ रोजीची स्थगित सभा शनिवार दिनांक १६ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.**

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०१८-१९ मधील आठवी बैठक २९ जानेवारी, २०१९ व दिनांक ६ फेब्रुवारी, २०१९ रोजीची स्थगित सभा शनिवार दिनांक १६ फेब्रुवारी, २०१९ रोजी बैठक दुपारी २.०० वाजता **सर फिरोजशहा मेहता, व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२** येथे आयोजित करण्यात आली. सभेमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरू) | सदस्य |
| ३. | श्री. दिपककुमार मुकादम | सदस्य |
| ४. | प्रा. (श्रीमती) रश्मी ओझा | सदस्या |
| ५. | डॉ. महादाप्पा गं. गोंडा | सदस्य |
| ६. | प्रा. डॉ. वैभव नरवडे | सदस्य |
| ७. | प्रा. डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| ८. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| ९. | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य |
| १०. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| ११. | डॉ. अजय देशमुख (कुलसचिव) | सदस्य सचिव |
| १२. | डॉ. कविता लघाटे (अतिरिक्त कार्यभार वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |
| १३. | डॉ. विनोद पाटील (संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ ) | निमंत्रित |

➢ **अनुपस्थिती :-**

सदर सभेस खालीस सदस्य अनुपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ रोहिदास काळे<br>संचालक, उच्च शिक्षण, संचालनालय | सदस्य |
| २. | सचिव, उच्च शिक्षण विभाग | सदस्य |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| ३. | डॉ. अभय वाघ (संचालक तंत्र शिक्षण संचालनालय) | सदस्य |
| ४. | प्रा. बी.एन. जगताप | सदस्य |
| ५. | प्रा.(डॉ.) मुरलीधर कु-हाडे | सदस्य |
| ६. | प्रा.(डॉ.) अजय भामरे | सदस्य |
| ७. | श्री प्रदिप सावंत | सदस्य |

प्रा. बी.एन. जगताप, प्रा.(डॉ.) मुरलीधर कु-हाडे, श्री प्रदिप सावंत यांनी त्यांची अनुपस्थिती कळविल्याने त्यांना अनुपस्थिती मंजूर करण्यात आली.

**स्वागत**

कुलसचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करून सभेस सुरूवात केली.

**श्रध्दाजंली**

काश्मीर मधील पुलवामा येथे झालेल्या दहशतवादयांच्या भ्याड हल्यात केंद्रीय राखीव दलाचे जवान शहिद झाले. त्या सर्वांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून भावपूर्ण श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र.१ | दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | असा ठराव करण्यात आला की, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त खालील दुरूस्तीसह मंजुर करण्यात आले.:-<br><br>१. इतिवृत्तावरील चर्चेच्या अनुषंगाने पान क्र. १४ वरिल मुद्दा क्र. १५<br><br>"(१५) व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीच्या दिवशी, जयहिंद महाविद्यालयाबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेना व उत्तर पत्रिकेवर नाव छापण्याच्याबाबत अखिल भारतीय विद्यार्थी परिषद संघटना मोर्चे घेऊन आले होते. आले व संघटनांनी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सदस्यांना भेटण्याची विनंती केली असता असा ठराव करण्यात आला की, व्यवस्थापन परिषदेत कोणत्याही संघटनेला बैठकीत सुनावणीसाठी बोलविण्यात येऊ नये." | |



Scanned by CamScanner

च्या ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे.

* "१५) ~~व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीच्या दिवशी महाराष्ट्र नवनिर्माण सेना व अखिल भारतीय विद्यार्थी परिषद संघटना मोर्चे घेऊन आले होते. संघटनांनी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सदस्यांना भेटण्याची विनंती केली असता~~ असा ठराव करण्यात आला की, व्यवस्थापन परिषदेत कोणत्याही व्यक्ती/संघटनेला बैठकीत सुनावणीसाठी व भेटण्याकरिता बोलविण्यात येऊ नये."

* व्यवस्थापन परिषदेची दि. १३/८/१८ ची स्थगित सभा १५/८/१८ बाबत २० (१०) अन्वये सुधारणा करण्यात आली.

२. इतिवृत्तावरील चर्चेच्या अनुषंगाने पान क्र. १५ वरिल मुद्दा क्र. १७

"१७) प्रा. वैभव नरवडे यांनी सांगितले की, प्राचार्याची प्रभारी मान्यता एक वर्षासाठी दिलेली आहे. विद्यापीठाने एक पत्रव्यवहार सह-संचालककडे करावा. कारण जे प्रभारी प्राचार्य आहेत, त्यांचा पगार शासनाकडून निघतो. परंतु असे प्रभारी प्राचार्य वर्षानुवर्षे कामकाज करत आहेत; प्रभारीच्या पगाराविषयी सह-संचालकानी निर्णय घ्यावा व व्यवस्थापन परिषदेमध्ये जे प्राचार्य प्रभारी पदावर होते त्या महाविद्यालयाचे कोणतेही कागदपत्र विद्यापीठाने स्वीकारू नये; प्राचार्य भरायचे परिपत्रक विद्यापीठाने काढावे व ज्या ठिकाणी प्रभारी प्राचार्य एक वर्षा पेक्षा जास्त आहे. अशा प्राचार्यांच्या पगाराचा निर्णय सह-संचालकांनी घ्यावा, कारण शासनाच्या निर्णयांचे उल्लघंन होत आहे, सांगितले आहे."

च्या ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे.

"१७) प्रा. वैभव नरवडे यांनी सांगितले की, प्राचार्यांना प्रभारी मान्यता एक वर्षासाठी दिलेली आहे. विद्यापीठाने यासंदर्भात पत्रव्यवहार सह-संचालककडे करावा, कारण जे प्रभारी प्राचार्य आहेत, त्यांचा पगार शासनाकडून निघतो. परंतु असे प्रभारी प्राचार्य वर्षानुवर्षे कामकाज करत आहेत; प्रभारी प्राचार्यांच्या पगाराविषयी सह-संचालकानी निर्णय घ्यावा. जे प्राचार्य प्रभारी पदावर आहेत त्या महाविद्यालयाचे कोणतेही दस्तावेज विद्यापीठाने स्वीकारू नयेत; प्राचार्य नेमणूकीचे परिपत्रक विद्यापीठाने काढावे व ज्या ठिकाणी प्रभारी प्राचार्य एक वर्षा पेक्षा जास्त कालावधीसाठी कार्यरत आहेत त्या संदर्भात विद्यापीठाने उच्च शिक्षण सह-संचालक यांना या संदर्भातील शासन निर्णयाचा संदर्भ देऊन पत्र पाठवावे."



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | ३. इतिवृत्तावरील चर्चेच्या अनुषंगाने पान क्र. १६ वरिल मुद्दा क्र. २१ ओळ क्र. १२ मधील 'भविष्यातील अंदाज' च्या ऐवजी 'भविष्यातील योजना' असे वाचावे.<br><br>तसेच ओळ क्र. १५ मधील 'इतर विषयांतील तज्ज्ञाचा समावेश करण्यात यावा.' च्या ऐवजी 'विविध विषयातील तज्ज्ञ व इतर हितसंबंधित घटकांचा (Stake Holders) समावेश करण्यात यावा,' असे वाचावे. | |
| बाब क्र.२<br><br>ठराव | दिनांक ७ डिसेंबर, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.<br><br>दिनांक ७ डिसेंबर, २०१८ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त खालील दुरूस्तीसह मंजुर करण्यात आले.<br><br>१. व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ७ डिसेंबर, २०१८ च्या इतिवृत्तातील पान क्र. ३ बाब क्र. १० मधील दुसरा परिच्छेद<br><br>"पुढे असाही ठराव करण्यात आला की, पुन्हा नव्याने चौकशी समिती स्थापन करून नव्याने चौकशी करण्यात यावी व चौकशी समितीने तातडीने अहवाल सादर करण्यात यावा."<br><br>च्या ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे.<br><br>"पुढे असाही ठराव करण्यात आला की, पुन्हा नव्याने चौकशी अधिकारी नेमूण चौकशी करण्यात यावी व चौकशी अहवाल तातडीने सादर करण्यात यावा. चौकशी अधिकारी नेमण्यांचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले."<br><br>२. व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ७ डिसेंबर, २०१८ च्या इतिवृत्तातील पान क्र. ७ बाब क्र. २१ मधील ठराव खालीलप्रमाणे वाचावा.<br><br>"ठराव क्र.२१: नुसार असा ठराव करण्यात आला की, स्थानिक चौकशी समितीचा (LIC) अहवाल स्विकारण्यात येऊन नॅशनल सेंटर फॉर रूरल डेव्हलपमेंट संस्थेंचे स्टर्लिंग कॉलेज ऑफ आर्टस् कॉमर्स अॅन्ड सायन्स चे तात्पुरते स्थलांतर (३६ महिन्यांसाठी) प्लॉट क्र. ९३, सेक्टर-१९, नेरूळ, नवी मुंबई येथून प्लॉट क्र. ९३, सेक्टर १९, नेरूळ, नवी मुंबई येथे करण्यास मान्यता देण्यात आली." | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |

| | | |
|---|---|---|
| | च्या ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे.<br><br>"ठराव क्र.२१: असा ठराव करण्यात आला की, स्थानिक चौकशी समितीचा (LIC) अहवाल स्विकारण्यात येऊन नॅशनल सेंटर फॉर रूरल डेव्हलपमेंट संस्थेंचे स्टर्लिंग कॉलेज ऑफ आर्टस् कॉमर्स ॲन्ड सायन्स चे तात्पुरते स्थलांतर (३६ महिन्यांसाठी) प्लॉट क्र. ४३, सेक्टर-१९, नेरूळ, नवी मुंबई येथून प्लॉट क्र. ९३, सेक्टर १९, नेरूळ, नवी मुंबई येथे करण्यास मान्यता देण्यात आली." | |
| बाब क्र.३<br><br><br>ठराव क्र.३ | २ जानेवारी, २०१९ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.<br><br>असा ठराव करण्यात आला की, सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत ठेवण्यात यावी. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| बाब क्र.२९<br><br><br><br><br><br>ठराव क्र.२९ | मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी (कलिना) परिसरातील सांस्कृतिक संकुलाला हिंदूहृदयसम्राट मा. श्री बाळासाहेब ठाकरे आर्टस् ॲन्ड कल्चरल सेंटर असे नामकरण करणेबाबत व सदर संकुलात मा. श्री बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्र सुरू करण्याबाबत.<br><br>महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कायदयातील तरतुदी तसेच नामकरणा बाबत संबंधि प्रक्रिया तपासून पुढे कायदेशीर अडचणी येउ नयेत याची दक्षता घ्यावी असे ॲड. निल हेळेकर यांनी सुचविले.<br><br>सदर बाब सविस्तर माहितीसह व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत सादर करावी, असे ठरले. | सामान्य प्रशासन विभाग |
| बाब क्र.३०<br><br><br><br>ठराव क्र.३० | नवनित एज्युकेशन सोसायटीचे रात्र महाविद्यालयाचे दिवस महाविद्यालयात रूपांतर करण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.<br><br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, मध्ये रात्र महाविद्यालयाचे दिवस महाविद्यालय करण्याची कोणतीही तरतुद करण्यात आलेली नसल्याने तसेच विद्यापीठाच्या बृहत आराखडयातील बिंदू नुसार रात्र | संलग्नता व मान्यता विभाग |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | महाविद्यालयाची परवानगी देण्यात आल्याने अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत दिनांक २१ जानेवारी, २०१९ बाब क्र. ३६ अन्वये नवनित एज्युकेशन सोसायटीचे रात्र महाविद्यालयाचे दिवस महाविद्यालयात रूपातर करण्याची विनंती अमान्य करण्याबाबत पारित करण्यात आलेला ठराव मंजुर करण्यात आला.<br><br>चर्चेच्या अनुषंगाने खालिल ठराव पारित करण्यात आले:-<br><br>१. एन.एम. महाविद्यालयाच्या स्वायत्ते प्रकरणात जो पर्यंत महाविद्यालय त्यांच्याकडे विविध प्रलंबित शुल्काचा भरणा करत नाही. तोपर्यंत महाविद्यालयाला स्वायत्ता देण्यात येऊ नये, अशी सुचना श्री दिपककुमार मुकादम यांनी केली असता, ती मान्य करण्यात आली.<br><br>२. व्यवस्थापन परिषदेच्या ११ डिसेंबर, २०१७ च्या बैठकीत बाब क्र. ८ अन्वये व दिनांक १० सप्टेंबर, २०१८ च्या बैठकीतील बाब क्र. २० अन्वये दोन विद्यार्थीनीच्या तक्रारी संदर्भात महिला विकास कक्षाच्या अहवाला नुसार डॉ. महेंद्र भवरे यांना दिलेल्या पाच वर्षाच्या शिक्षेचा कालावधी हा व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ११ डिसेंबर, २०१७ च्या बैठकी पासून गणन्यात यावा, असे ठरले. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले.

कुलसचिव

प्र-कुलगुरू

कुलगुरू



Scanned by CamScanner